राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान वितरित करण्यास मंजुरी बाबत सन २०१८-१९.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्यांक विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक : नाक्षेवि -२०१९/प्र.क्र.२२/का.९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. २८ फेब्रुवारी , २०१९

<u>संदर्भ</u> :- १) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि. १८ जून, २०१५.
२) शासन पूरकपत्र, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.५/का.९, दि. ९ मार्च, २०१६.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग , क्र. अर्थसं - २०१८/ प्र.क्र. ६९/अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८.
४) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१८/प्र.क्र. ५१/का.९, दि. ०८ मे, २०१८.
५) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१८/प्र.क्र. ८३/का.९, दि. ३० ऑक्टोबर, २०१८.
६) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१८/प्र.क्र.१४०/का.९, दि. १७ नोव्हेंबर, २०१८.
७) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१८/प्र.क्र.१३९/का.९, दि. २६ नोव्हेंबर, २०१८.
८) शासन परिपत्रक, वित्त विभाग , क्र. अर्थसं - २०१८/ प्र.क्र. ६९/अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९.

<u>प्रस्तावना</u> :-

अल्पसंख्याक विकास विभागाने सन २००८-०९ या वर्षापासून राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांकरिता क्षेत्रविकास कार्यक्रम कार्यान्वित केला असून उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ही योजना सन २०१५-१६ या वर्षात राबविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन पूरकपत्रान्वये, दि.१८जून,२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील योजनेची कार्यपध्दती या शीर्षाखाली परिच्छेद (ब) (iii) च्या पुढे परिच्छेद दाखल करण्याचा निर्णय शासन मान्यतेने घेतला आहे. त्यानुसार मा. खासदार व आमदार यांच्या प्रस्तावांना महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायत हद्दीमध्ये कामाच्या संख्येची मर्यादा एकापेक्षा जास्त परंतू प्रति काम प्रति वर्षी महानगरपालिकेस कमाल रु.४० लक्ष, "अ" वर्ग नगरपालिकेस कमाल रु.३०लक्ष, “ब" व रु.२०लक्ष "क" वर्ग नगर पंचायतींना असू शकेल, अशी तरतूद आहे. मा.खासदार व आमदार व जिल्हाधिकारी यांच्याकडून महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत यांचे प्राप्त प्रस्तावांना मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

सन२०१८-१९या आर्थिक वर्षात नागरी क्षेत्र विकास योजनेकरिता रु.२६,४०,००,०००/-(अक्षरी रूपये सव्वीस कोटी चाळीस लक्ष फक्त) एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. वित्त विभाग शासन परिपत्रक दि.०२एप्रिल,२०१८ अन्वये प्रथम नऊ महिन्यांकरिता (डिसेंबर,२०१८अखेर) अर्थसंकल्पित निधीच्या ७०टक्के निधी वितरणास मान्यता प्राप्त झाली होती. त्यामुळे एकूण मूळ अर्थसंकल्पित रु.२६,४०,००,०००/-(अक्षरी रूपये सव्वीस कोटी चाळीस लक्ष फक्त)तरतूदीच्या ७० टक्के म्हणजे रू.१८,४८,००,०००/-(अक्षरी रूपये अठरा कोटी अठ्ठेचाळीस लक्ष फक्त) एवढा निधी डिसेंबर,२०१८अखेर पर्यंत उपरोक्त बाबींकरिता वितरणास उपलब्ध होते. त्यापैकी शासन निर्णय, दिनांक०८.०५.२०१८ अन्वये रु.३०.०० लक्ष व शासन निर्णय, दिनांक३०.१०.२०१८ अन्वये, रु.१०.३३कोटी व शासन निर्णय, दिनांक१७.११.२०१८अन्वये रु.१०.००लक्ष, शासन निर्णय, दिनांक२६.११.२०१८ अन्वये रु.५०.००लक्ष असे एकूण रु.११.२३कोटी (अक्षरी रुपये अकरा कोटी तेवीस लक्ष फक्त) निधी वितरीत करण्यात आला आहे. आता वित्त विभाग शासन परिपत्रक दि.२५ जानेवारी,२०१९ अन्वये अर्थसंकल्पित निधीच्या खर्चाची मर्यादा महसूली लेख्यातील कार्यक्रमाच्या खर्चाच्या बाबीवर८०टक्के निधी वितरणास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार एकूण मूळ अर्थसंकल्पित रु.२६,४०,००,०००/-(अक्षरी रूपये सव्वीस कोटी चाळीस लक्ष फक्त) तरतूदीच्या ८०टक्के म्हणजे २१,१२,००,०००/-(अक्षरी रुपये एकवीस कोटी बारा लक्ष फक्त) पैकी सर्व एकूण रु.११,२३,००,०००/- (अक्षरी रुपये अकरा कोटी तेवीस लक्ष फक्त) निधी वितरीत करण्यात आला आहे. **सद्य:स्थितीत उर्वरित एकूण रु.९,८९,००,०००/-(अक्षरी रुपये नव कोटी एकोणनव्वद लक्ष फक्त) इतका निधी राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांकरिता क्षेत्रविकास योजनेकरिता मार्च २०१९ अखेर पर्यंत वितरणास उपलब्ध आहे.** सन २०१८-१९या आर्थिक वर्षाकरिता निधी मिळण्यासाठी मा. मंत्री/ राज्यमंत्री/ खासदार/ आमदार तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडून शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावांना महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत हद्दीमध्ये कामाच्या प्रस्तावांना शासन मान्यतेने या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट "अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत एकूण **रु. ६,१५,००,०००/- (एकूण अक्षरी रुपये सहा कोटी पंधरा लक्ष फक्त)** एवढा निधी मंजूर करण्यात येत आहे. सदर निधी संबधित महानगरपालिका/ नगरपालिका/ नगर पंचायत ज्या जिल्हयांमध्ये स्थित आहेत, त्या जिल्हयांचे जिल्हाधिकारी याना स्वाधीन करण्यात येत आहे.

२. संबंधित महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपंचायतींना मंजूर करण्यात आलेले अनुदान वितरित करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. **परिशिष्ट "अ"** मध्ये दर्शविलेली कामे इतर योजनेतून करण्यात आलेली नाहीत, याची शहानिशा व खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी व जर सदर काम इतर योजनेतून मंजूर केले असल्यास त्या बदल्यात सदर योजनेतील इतर काम मंजूर निधीच्या मर्यादेत राहून बदल करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना राहतील. उपरोक्त कामाच्या बदल्यात सदर योजनेतील इतर काम करणे शक्य नसल्यास त्यासाठी वितरीत केलेला निधी शासनाच्या कोषागारात तात्काळ जमा करण्यात यावा. तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून प्राप्त करून घ्यावे. याबाबतची सर्व कागदपत्रे शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्राप्त करून घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी. त्यानंतर त्यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात यावी व निधी संबंधित

महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत यांना सुपूर्द करण्यात यावा. तसेच सदर कामे महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायतीच्यां बांधकाम विभागामार्फत रितसर करुन घेण्यात यावीत.

३. राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायतींनी मागणी केल्यानुसार ज्या विवक्षित प्रयोजनासाठी निधि मंजूर करण्यात आला आहे, केवळ त्याच प्रयोजनासाठी संबंधित महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपंचायतींना निधी खर्ची टाकणे अनिवार्य आहे. संबधित जिल्हाधिकाऱ्यांकडून अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर संबंधित महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपंचायतींना सहा महिन्यांच्या कालावधीत प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे या शासन निर्णयाच्या परिशिष्ट "ब" मध्ये विहित केलेल्या नमुन्यात जिल्हाधिकाऱ्यांनी अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपंचायतींनी हाती घेतलेल्या विकासकामांच्या प्रगतीबाबत संनियंत्रण करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर करावा.

४. या योजनेंतर्गत होणारा खर्च " मागणी क्र. झेडई-१, मुख्यलेखाशिर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०७) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात क्षेत्रविकास योजनेकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम) (२२३५-ए-१३१) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षाकरिता मंजुर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. “सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ३ व ८येथील वित्त विभागाच्या अनुक्रमे दि.२एप्रिल,२०१८आणि दि.२५जानेवारी,२०१९रोजीच्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामधील मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.”

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०२२८१३०८४५२८१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: CN = Sandesh Chhabu Tadvi, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Minorities Development Department
Date: 2019.02.28 13:11:22 +05'30'

(सं. छ. तडवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
५. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,

६. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
९. संबंधित विभागीय आयुक्त,
१०.आयुक्त, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
११.संबंधित जिल्हाधिकारी,
१२.आयुक्त, संबंधित महानगरपालिका,
१३.मुख्याधिकारी, संबंधित नगरपालिका,
१४.मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे खाजगी सचिव,
१५.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
१७.निवडनस्ती (का-९)

शासन निर्णय ,अल्पसंख्याक विकास विभाग क्र. नाक्षेवि-२०१९ /प्र.क्र. २२ /का.९,
दि. २८ फेब्रुवारी, २०१९.

परिशिष्ट - "अ"

महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याक बहुलनागरी क्षेत्रांकरिता क्षेत्र विकास कार्यक्रम महानगरपालिका /नगरपालिकांचे जिल्हानिहाय निधी वितरणाचे विवरणपत्र.

अ. क्र.	जिल्हा	म.न.पा./ न.प./ न.पा.	कामाचे नांव	मंजूर निधी (रुपये)
१	**धुळे**	दोंडाईचा	१) दोंडाईचा कब्रस्थान मुलभूत सुविधा निर्माण करणे	१० लक्ष
			२) नदीपार कब्रस्थान मधील सोईसुविधा निर्माण करणे	१० लक्ष
			३) नरगपंचायत दोंडाईचा येथे पिंजारी समाज सभागृह बांधणे.	१० लक्ष
			जिल्हा धुळे	**३०लक्ष**
२	**नाशिक**	सटाणा	सटाणा कब्रस्थान मुलभूत सुविधा निर्माण करणे	१०लक्ष
			जिल्हा नाशिक	**१०लक्ष**
३	**जळगाव**	जामनेर न.प.	जामनेर मुस्लिम कब्रस्थान मधील नाल्यावर कलर्व्हट बांधणे.	२०लक्ष
		मुक्ताईनगर	बुढन मिस्तरी जे अलफगलाह उर्दू हायस्कूल ते भवानी मंदिर ते काझीपुरा आखाडा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.	२०लक्ष
		अमळनेर	१)कब्रस्थानास संरक्षण भिंत बांधणे	१०लक्ष
			२)अमळनेर शहरातील दाऊदी बोहरा समाजाच्या कब्रस्तानजवळ पोहच रस्ता व अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.	१०लक्ष
			जिल्हा जळगाव	**६०लक्ष**
४	**नागपूर**	सावनेर न.प.	मुस्लीम कब्रस्थान विकास कामे करणे	२०लक्ष
		नागपूर म.न.पा.	हसनबाग मस्जिद परिसराला लागून सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे.	२०लक्ष
			जिल्हा नागपूर	**४०लक्ष**
५	**लातूर**	लातूर न.पा.	लातूर शहरातील आयेशा कॉलनी येथे सिमेंट रस्ता करणे	२०लक्ष
			जिल्हा लातूर	**२०लक्ष**
६	**मुंबई उपनगर**	मुंबई म.न.पा.	१) गोरेगाव (पश्चिम) येथील मोकल गल्ली, भगतसिंग नगर नं.१ गोरेगाव पश्चिम गटारे व लादीकरण करणे.	१०लक्ष
			२) गोरेगाव (पश्चिम) येथील चक्की गल्ली भगतसिंग नगर नं.१ गोरेगाव पश्चिम गटारे व लादीकरण करणे.	१० लक्ष

			३)बोरीवली प्रभाग क्र.१५ मध्ये बोरभाटपाडा शौचालय दुरुस्ती करणे	२० लक्ष
			४) बोरीवली प्रभाग क्र.१५ मध्ये शास्त्रीनगर येथील रस्ता दुरुस्ती करणे	१५ लक्ष
			५) बोरीवली प्रभाग क्र.१५ मध्ये हरीजन निवास एल.टी.रोड येथे पायवाटा दुरुस्ती करणे	२५लक्ष
			६) बोरीवली संगिता निवास शेजारील रस्ता दुरुस्ती करणे	१०लक्ष
			७) बोरीवली प्रभाग क्र.१७ मध्ये मल्हारी इमारत येथील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करणे	१०लक्ष
			८)बोरीवली प्रभाग क्र.१७ मध्ये साईबाबा नगर जी. बी. जी. डे इमारतीच्या आवारातील पायवाटांची सुधारणा करणे.	२०लक्ष
			९) बोरीवली प्रभाग क्र.१७ मध्ये हरीदास नगर गटार दुरुस्ती करणे.	२०लक्ष
			१०) बोरीवली प्रभाग क्र.१७ मध्ये सत्यनगर येथील इंद्रप्रस्थ कॉम्प्लेक्स मधील रस्त्यांची दुरुस्ती करणे.	१५लक्ष
			११) बोरीवली प्रभाग क्र.१७ मध्ये सत्यनगर येथील शिवदर्शन व शिवधाम येथील रत्यांची दुरुस्ती करणे.	२०लक्ष
			१२) बोरीवली कुलुपवाडी बोरीवली (पूर्व) येथे शौचालय दुरुस्ती करणे.	५लक्ष
			१३) लक्ष्मीनगर कांदिवली (पूर्व) येथे पायवाटा व गटारे दुरुस्ती करणे.	५लक्ष
			१४) दहिसर केतकीपाडा पायवाट व गटारे दुरुस्ती करणे	५लक्ष
			१५) दहिसर लाला कंपाऊंड चाळ, केतकीपाडा, दहिसर (पूर्व) येथे शौचालय दुरुस्ती करणे	५लक्ष
			जिल्हा मुंबई उपनगर	**१९५लक्ष**
७	**ठाणे**	भिवंडी म.न.पा.	अल्पसंख्यांक वस्तीत अजंटा कंपाऊंड येथे गटार व पाथवेज तयार करणे	२०लक्ष
			जिल्हा ठाणे	**२०लक्ष**
८	**सांगली**	सांगली म.न.पा.	भारत जैन समाजाच्या श्रीमती कळंत्री आक्का आश्रमाच्या खुल्या जागेत सभागृह बांधणे	२० लक्ष
		जत न.प.	इदगाह मैदान येथे संरक्षण भिंत बांधणे	२०लक्ष

		मिरज म.न.पा.	प्रभाग क्र.३ मधील इस्रायल नगर येथे सांस्कृतिक भवन बांधणे.	२०लक्ष
			जिल्हा सांगली	**६० लक्ष**
९	**भंडारा**	पवनी न.प.	१) ममरेंज खॉ बाब दर्गा समोर मोकळया जागेत सभामंडप व शौचालयासह बांधकाम करणे.	१५ लक्ष
			२) मुस्लीम प्रभागात सिमेंट व रस्ते व नाली कव्हरसहीत बांधकाम करणे.	२०लक्ष
			जिल्हा भंडारा	**३५ लक्ष**
१०	**औरंगाबाद**	औरंगाबाद म.न.पा.	१)वार्ड क्र.३६ अंतर्गत नारेगाव येथील गट नं.८ मुस्लीम कब्रस्तान मध्ये शेड उभारणे	१० लक्ष
			२)गुलमोहर कॉलनी वार्ड क्र.६४ येथील अब्दुल रसीद यांचे घर तेजयवाळ यांचे घरापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे.	१०लक्ष
			३) प्रभाग क्र.६ नालसहाबपुर येथे मोबिन ठेकेदार यांचे दुकानापासून ते शैला किराणा दुकानापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे.	१०लक्ष
			जिल्हा औरंगाबाद	**३० लक्ष**
११	**अहमदनगर**	शेवगाव न.प.	संत आंदरिया चर्च, पैठणरोड, शेवगाव येथे पेव्हरब्लॉक बसविणे व संरक्षक भिंत बांधणे.	२० लक्ष
			जिल्हा अहमदनगर	**२०लक्ष**
१२	**परभणी**	सेलू न.प.	१) वार्ड क्र.८ मधील अल्पसंख्याक वस्तीमध्ये चांद सावली दर्गा जवळील परिसराचे सौदर्यीकरण व हायमेस्ट लाईट लावणे.	१५ लक्ष
			२) वार्ड क्र.८ मधील अल्पसंख्याक वस्तीमध्ये समिर शेख (केबलवाले) ते अनिल चौधरी यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता.	५ लक्ष
			३) वार्ड क्र.८ मधील अल्पसंख्याक वस्तीमध्ये मुर्तूजा मंसुरी ते मालेराम नरेडी यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता.	५लक्ष
		परभणी न.पा.	अल्पसंख्यांक वस्तीत क्रांतीनगर येथे खदानीच्या मोकळया जागेवर कंपाऊंड वॉल बांधणे.	१०लक्ष
			जिल्हा परभणी	**३५ लक्ष**
१३	**रत्नागिरी**	राजापूर न.पा.	१) अल्पसंख्यांक वस्तीत मौजे ओझर मुख्य रस्ता ते मुस्लिम कब्रस्थान मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.	४ लक्ष

			२) अल्पसंख्यांक वस्तीत मौजे परटवली येथील मुस्लिमवाडी कब्रस्थान भिंत बांधणे.	४ लक्ष
			३)अल्पसंख्यांक वस्तीत मौजे सौंदळ मुख्य रस्ता ते जाणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे	४ लक्ष
			४)अल्पसंख्यांक वस्तीत मौजे जैतापूर साईमंदिर ते मशिद रस्ता डांबरीकरण करणे.	४ लक्ष
			५) अल्पसंख्यांक वस्तीत मौजे जैतापूर मधील वाडा पाटील घर ते एस.टी.स्टॅण्ड जैतापूर रस्ता डांबरीकरण करणे.	४ लक्ष
			जिल्हा रत्नागिरी	**२० लक्ष**
१४	**वाशिम**	मानमोठे न.प.	मानमोठे नगर येथे अल्पसंख्यांक वस्ती अंतर्गत रस्ता बांधणे	१० लक्ष
			जिल्हा वाशिम	**१० लक्ष**
१५	**कोल्हापूर**	म.न.पा	प्रभाग क्र.१७ सदर बाजार अंतर्गत विचारेमळा येथे कब्रस्थानची दुरुस्ती व सुविधा	१० लक्ष
			जिल्हा कोल्हापूर	**१० लक्ष**
१६	**चंद्रपूर**	वरोरा न.प.	मुस्लीम समाजाकरीता समाजभवन बांधकाम करणे.	२० लक्ष
			जिल्हा चंद्रपूर	**२० लक्ष**
			एकूण रुपये	**६१५ लक्ष**
(अक्षरी एकूण रुपये सहा कोटी पंधरा लक्ष फक्त)				

****

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: CN = Sandesh Chhabu Tadvi, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Minorities Development Department
Date: 2019.02.28 13:11:55 +05'30'

(सं. छ. तडवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय ,अल्पसंख्याक विकास विभाग क्र. नाक्षेवि -२०१९ /प्र.क्र. २२ /का.९,
दि. २८ फेब्रुवारी, २०१९.

परिशिष्ट - "ब"

उपयोगिता प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रांसाठी कार्यान्वित केलेल्या क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, **क्र. नाक्षेवि -२०१९ /प्र.क्र. २२ /का.९** अन्वये वितरित केलेला रु. अक्षरी रु.) एवढा निधि पुढील विकासकामांसाठी उपयोगात आणला आहे :-

विकासकाम/ विकासकामे	वापरलेली रक्कम
अ.	रु.
ब.	रु.
क.	रु.
ड.	रु.

असेही प्रमाणित करण्यात येते की, क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत ज्या निकष / अटींनुसार शासनाने अनुदान मंजूर केले होते, त्या निकष/ अटींची यथायोग्यरित्या पुर्तता करण्यात आली आहे. तसेच ज्या प्रयोजनाकरिता निधि मंजूर करण्यात आला होता, त्याच प्रयोजनाकरिता निधिचा प्रत्यक्षात विनियोग झाला आहे, याची खातरजमा करण्याकरिता मी खालील दस्तऐवज/अभिलेखांची तपासणी केली आहे :-

तपासणी केलेल्या दस्तऐवज/अभिलेखांचे प्रकार :-

१. प्रमाणक आणि पुस्तक लेखा (Vouchers and Book of Accounts)
२. मोजणी पुस्तके (Measurement Books)
३. सहायक अनुदान / कर्ज नोंदवही (Grant-in-aid/ Loan Register)
४. खर्च नोंदवही (Expenditure Register)

आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगरपालिका यांची स्वाक्षरी	संबंधित महानगरपालिका / नगरपालिका ज्या जिल्हयात स्थित आहेत त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी
नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा	नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा

*****